# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
**Email ID : education.nmc@gmail.com**

सिव्हील कार्यालय,नागपूर
जा.क्र. शि.वि./8389/2014
दि. 14/11/2014

## परिपत्रक

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
मनपा नागपूर

**विषय :– मनपाच्या शाळेत होणाऱ्या पाणी पुरवठया पोटी प्राप्त पाणीपट्टीच्या देयकाचे भुगतानाबाबत.**

**संदर्भ :– क्र.जप्र / 607 / का.अ., दि. 02.09.2014.**

नागपूर शहर 24 × 7 पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत नागपूर शहर पाणी पुरवठा प्रणालीतील सर्व उपभोगत्यांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा हिशोब ठेवणे बंधनकारक असल्यामुळे मनपाच्या इमारतीत होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या मोजमापाकरिता मीटर लावण्यात आले असून वापरलेल्या पाण्याचे देयक शाळांना देण्यात येत आहेत. संबंधित शाळांनी प्राप्त पाणी देयकांचे भुगतान करण्याकरिता खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

1) पाणीपट्टीचे देयक शाळेला प्राप्त झाल्यावर संबंधित शाळेंनी आकस्मिक खर्चाचे देयक तयार करून प्रदानार्थ शिक्षणाधिकारी तथा आवश्यकता भासल्यास उपायुक्त यांची मंजुरी घेवून द्विनोंद नोंदीसाठी (JV) लेखा विभागात पाठवावे.

2) लेखा विभागातून सदर देयकावर JV क्रमांक प्राप्त झाल्यावर संबंधित शाळांनी देयक प्रदानार्थ मंजुर करण्यात आलेल्या नोटशीट व JV नोंद असलेल्या देयकाची झेरॉक्स प्रत संबंधित शाळांनी स्वतःकडे ठेवून मुळ प्रत जलप्रदाय विभागाचे (NESL) कार्यालय, धरमपेठ, भौले पेट्रोल पंप जवळ, डिक दवाखान्याचे मागे येथे सादर करावी.

यानंतरची कार्यवाही NESL व लेखा विभाग अंतर्गत होणार असल्याने सर्व शाळांनी वर नमूद कार्यपद्धतीचा अवलंब करून पाणीपट्टी देयक भुगतानाची कार्यवाही करून सहकार्य करावे.

**शिक्षणाधिकारी,**
नागपूर महानगरपालिका, नागपूर

D:\Dumre Sir \Letter 2